# देव सर

**डॉ. निशिकान्त श्रोत्री**

'किंग मिडास वाज अ व्हरी ग्रीडी किंग,' विश्वास करमरकरने धड्याचे पहिलेच वाक्य वाचून संपविले आणि सरांनी त्याला तिथेच थांबवून बसायला सांगितले.

'किंग मिडास हा ग्रीस मधील राजा,' देव सरांनी आमच्या पाठ्यपुस्तकातील ग्रीक पौराणिक कथा शिकवायला सुरुवात केली.

'ग्रीस देशाचा राजा,' हे शब्द उच्चारून झाल्याबरोबर त्यांनी वर्गातील आपल्या खुर्चीवर बसून ग्रीक राजे कसे ऐटित बसत ते दाखविले आणि त्याच अवस्थेत त्यांनी ग्रीस देशाविषयी काही माहिति द्यायला सुरूवात केली. त्यानंतर 'वॉज' हे क्रियापद आपल्याला कशी भूतकाळाची ओळख करून देते हे सांगितले आणि पुन्हा ते सगळ्या वर्गाला अतिप्राचिन अशा भूतकाळात म्हणजे ग्रीकांच्या पौराणिक काळात घेऊन गेले. त्यानंतर आपल्या रसाळ वाणीतून आणि अभिनयातून मिडास राजा, त्याचा राजवाडा, त्याची अतिलोभी वृत्ती आणि तदनुषंगाने येणाऱ्या यच्चयावत गोष्टी साऱ्या वर्गासमोर अक्षरशः साकार केल्या. खरे तर विसावे शतक मागे टाकून ते केव्हाच मिडास राजाच्या महालात जाऊन पोहोचले होते - मनाने! आता ते परत वर्तमानकाळात, टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूलच्या दहावी अ च्या वर्गात परत केव्हा परततील ते सांगणे कोणालाच शक्य नव्हते.

अखेरीस तास संपल्याची घंटा वाजली आणि मिडास राजाच्या महालातून देव सर आपल्या कर्मभूमीत येऊन पोहोचले. शाळेची घंटा आमच्या वर्गाच्या अगदी दारातच असल्यामुळे तिच्या आवाजाने आमच्या वर्गाच्या अगदी कानठळ्या बसायच्या, मग देव सर भूतकाळातून वर्तमानकाळात यायला काय विलंब लागणार!

आपण राजा मिडासचे भाट नसून शाळेतील इंग्रजीचे शिक्षक आहोत याची जाणीव झाल्याबरोबर त्यांनी टेबलावरचे आपले पुस्तक उचलले, त्यातील धड्याच्या पानावर नजर टाकली आणि क्षणार्धातच त्यांना हंसू फुटले.

'सात शब्द शिकलो आपण एका तासात, नाही!' सरांच्या या वाक्यात उपरोध किती, गंमत किती आणि गांभिर्य किती याचा विवेक करण्याइतके आम्ही विद्यार्थी अजून पुरेसे परिपक्व नसावे कदाचित! तरीही आपल्या नेहेमीच्या गमतीशीर स्वभावानुसार माझ्याच बाकावर बसणारा माझा मित्र विश्वास हळूच माझ्या कानात कुजबुजलाच. त्याचे ते शब्द ऐकले अन् एखाद्या चुगलीखोर व्रात्य मुलासारखे माझ्या ओठांमधून हंसू बाहेर फिसकले.

'काय झालं रे हंसायला?' माझे हंसणे साऱ्या वर्गात पसरले होते ते देव सरांपासून कसे लपणार!

माझ्या हसण्याचे कारण सांगायचे मात्र मला धाडस होईना. काही झाले तरी विश्वास हा माझा अगदी जवळचा मित्र हे जितके खरे तितकेच माझा स्वभाव चुगलखोर नव्हता हे ही सत्य होते. या अडचणीतून मात्र मला देव सरांनीच सोडविले. त्यांनी माझ्या हंसण्याचे कारण विश्वासलाच विचारले.

'काय पुटपुटलास रे त्याच्या कानात?' देव सरांच्या या प्रश्नाचे विश्वासवर मात्र कसलेच दडपण आले नाही.

'सर, मी त्याला म्हणालो की,' विश्वास बिनधास्त सांगू लागला. 'सात शब्द आणि त्यांच्या बरोबर एक पूर्णविराम देखील.'

'हो, हो, पूर्णविराम देखील; आणि तो देखील एक संपूर्ण,' देव सरांच्या या बोलण्यात नक्की कोणत्या भावना आहेत याचा आम्हाला अंदाज यायच्या आतच ते

मोठमोठ्याने मनमोकळेपणे हंसू लागले. 'पण वाचतांना मात्र तू तो पूर्णविराम वाचला नव्हतास.'

विश्वासच्या पदरात त्याच्याच विनोदाचे माप घालून, आपल्याला त्याचा राग आलेला नाही याची ग्वाही देऊन देव सरांनी वर्ग सोडला. मात्र त्यानंतर कित्येक दिवस ते आपल्या शिकविण्यातील सर्व विरामचिन्हांचा हिशेब विश्वासकडे मागत होते.

इतक्या मोकळेपणाने वर्गातील विद्यार्थ्यांशी आपुलकीचे आणि सौहार्दाचे नाते ठेवणारे देव सर वेळ प्रसंगी एखादे वेळेला जरी विद्यार्थ्यांवर हात उचलत असले तरी ते विद्यार्थ्यांमध्ये खट किंवा मारकुटे म्हणून नक्कीच कुप्रसिद्ध नव्हते.

वास्तविक ते मुळातच प्रेमळ स्वभावाचे होते. त्यांचे प्रेम हे शिक्षक-विद्यार्थी या नात्याच्याही पलिकडचे असावे, किमान ते पालक-पाल्य या नात्यापर्यंतचे तरी नक्कीच असावे असे माझे अगदी पहिल्या दिवसापासून मत झाले होते.

भर वर्गात खडूच्या भुकटीने माखलेल्या आपल्या हातने देव सरांनी माझा कान छरला, पण तो शिक्षा म्हणून नव्हे तर माझी व्याधी पाहण्यासाठी. लहानपणापासून माझे कान टोचले होते त्या जागी सारखे चिडत असत. खूप उपचार करून झाले होते पण काही दुखणे थांबत नव्हते. सर्व विद्यार्थ्यांकडे आपुलकीच्या नजरेने पाहणाऱ्या देव सरांच्या नजरेतून माझे हे दुखणे सुटणे शक्यच नव्हते.

दुसरे दिवशी वर्गात आल्याआल्या त्यांनी माझ्या हातात एक छोटीशी बाटली ठेवली. साबुदाण्यासारख्या दिसणाऱ्या गोळ्यांनी भरलेली ती बाटली पाहून माझ्या डोळ्यात भले मोठे प्रश्नचिन्ह तरळले.

'डोळे एवढे मोठ्ठे मोठ्ठे करून पहायची काही गरज नाही. त्या गोळ्या घ्यायच्या रोजच्या रोज,' अन् त्यांनी मला त्या गोळ्या किती आणि कशा घ्यायच्या ते समजावून सांगितले. तेव्हा कोठे मला देव सर होमिओपॅथीचे देखील जाणकार आहेत हे समजले.

आपल्या या होमिओपॉथीच्या उपचारांनी त्यांनी माझा वर्गमित्र विनय जोशी याची बऱ्याच दिवसांपासून त्याला छळणारी पोटदुखी देखील बरी केली होती हे लगेचच त्याने मला मधल्या सुट्टीत सांगितले.

त्यांच्या त्या गोळ्यांनी पंधरा दिवसांतच माझा कान चिडायचा जो थांबला तो त्यानंतर आता पंचावन्न वर्षे झाली तरी तो शांतच आहे.

देव सरांना मात्र मी माझा कान बरा झाल्याचे आपण होऊन सांगितले नाही याचे वैषम्य वाटले अन् त्यांनी ते भर वर्गात तसे बोलूनही दाखविले. या शिष्टाचाराच्या बाबतीत मी जरा वेंधळाच होतो ना! सरांनी जाणीव करून दिल्यानंतर मात्र मी ओशाळेपणे त्यांची माफी मागितली. यावर त्यांची प्रतिक्रिया मात्र केवळ मायेने मला पोटाशी घेण्याचीच होती.

त्या काळात विद्यार्थ्यांवर चिडणे, रागावणे, वेळप्रसंगी त्याच्या अंगावर हात टाकणे या प्रकारची वागणूक विद्यार्थ्यांना शिस्त लावण्यासाठीच असल्यामुळे त्याला कोणाचाच, अगदी पालकांचा देखील आक्षेप नसे.

एकोणीसशे पन्नासच्या अखेरच्या काळात विद्यार्थ्यांचे बालमानसशास्त्र सांभाळून त्यांना आंजारून गोंजारून, त्यांच्या कलाकलाने घेऊन त्यांना सन्मार्गावर आणण्याची टूम अजून निघाली नव्हती. समस्त शिक्षक आपापल्या परीने विद्यार्थ्यांना शिस्तच लावण्याचा प्रयत्न करीत असत; मात्र त्यासाठी प्रत्येक शिक्षकाचे मार्ग भिन्न भिन्न होते. कोणाला विद्यार्थ्यांना धारेवर धरण्यात धन्यता वाटत असे तर कोणाला विद्यार्थ्यांमध्ये मिळून मिसळून वागण्यात.

देव सर या सगळ्याचेच बेमालूम आणि तरीही संयमित मिश्रण होते. साम, दाम, दंड वा भेद - ज्या कोणत्या मार्गाचा विद्यार्थ्यांवर प्रयोग करायचा तो आपल्या भावनांना,

विशेषतः संतापाला वाट करून देण्यासाठी नाही तर केवळ त्या विद्यार्थ्याचे हित साधण्याकरिताच यावर देव सरांचा गाढा विश्वास होता.

म्हणूनच विद्यार्थ्यांना शिक्षा करण्याच्या त्यांच्या तऱ्हा देखील काहीश्या खास आणि आगळ्याच होत्या. मात्र या सगळ्या शिक्षांचा हेतू मुलांना इजा करण्याचा नव्हता तर केवळ त्यांना त्यांच्या चुकीची जाणीव करून देण्याइतकाच होता. रागावून बोलणे हे तर बहुतेक सर्वच शिक्षक करीत असतात, पण सहसा देव सर जहाल मार्गाचा वापर करण्या ऐवजी खोचक बोलून त्या विद्यार्थ्याला त्याच्या चुकीची जाणीव करून देत आणि त्याच्याकडून ती चूक दुरुस्त करून घेत. शारीरिक शिक्षाच करायची तर ते चौदाव्या रत्नाचा वापर क्वचितच करीत असत. कधी कधी उलटया डस्टरचा स्पर्श हलकेच त्याच्या उलटया पंजावर करीत तर कधी एखाद्याचा कान धरीत. विद्यार्थ्याला जमिनीवर लोळायला लावायची त्यांची एक अजब शिक्षा होती.

अर्थात शिक्षा करतांना देखील त्यांना विद्यार्थ्याची फार काळजी असे. त्याच्याकडून फारच मोठी आगळीक झाल्यामुळे त्याच्या श्रीमुखात भडकावायचा निर्णय सरांनी घेतलाच तर ते प्रथम त्याला चष्मा नाही ना याची खात्री करून घेत. असेलच जर चष्मा तर आधी त्याला चष्मा काढून नीट ठेवून द्यायला सांगत आणि मगच त्यांचा हात त्याच्या गालांचा वेध घेई. थोबाडीत दिल्यावर चष्मा खाली पडून फुटू नये याचो ते कायमच काळजी घेत असत. त्यामुळे सरांनी कोणालाही चष्मा काढायला सांगितला की त्या मुलाची गाळणच उडत असे.

शिक्षेचा सोपस्कार संपल्यानंतर मात्र दुसऱ्याच क्षणापासून सर पुन्हा आपल्या गमतीशीर शिकविण्याला सुरूवात करीत. कोणाहीविषयी द्वष धुमसत ठेवणे हे त्यांच्या स्वभावातच नव्हते.

त्यांच्या शिक्षेच्याच काय पण विद्यार्थ्यांशी वागण्याच्या तऱ्हा शा अजब होत्या तश्याच त्यांच्या शिकविण्याच्या पद्धती देखील! विद्यार्थ्यांना अंतर्बाह्य आकलन व्हावे, त्यांच्या गळी उतरावे आणि त्यांच्या बुद्धोत मुरावे म्हणून सांगण्याच्या त्यांची स्वतःची अशी खास भाषाशैली होती, शिकविण्याची सूत्रे होती.

“ट् च्या पुढे क्रियापदाला कधीही आयएनजी लावायचा नाही” किंवा “फॉरच्या पुढे क्रियापद आल्यास त्याला कायम आयएनजी लावायचा” किंवा “इफच्या पुढे विल येत नाही, ते मुळातच भविष्यकाळ दर्शक असते” अशा प्रकारचे इंग्रजी व्याकरणातील काही नियम, रेन मार्टिनमध्ये स्पष्टपणे दिलेले असले तरी त्यात सहसा विद्यार्थी चुका करतात हे ध्यानात घेऊन देव सरांनी काही नियम बनविले होते. या नियमांना ते बापजन्माचे नियम असे म्हणत. साऱ्या वर्गाकडून त्यांचे हे बापजन्माचे दहा नियम पाठ करून घेण्यात त्यांना विलक्षण धन्य वाटत असे.

आज मात्र या आणि अशा काही इंग्रजी व्याकरणातील मूलभूत चुका सर्रास वापरतांना कानावर येते तेव्हा देव सरांच्या या बापजन्माच्या दहा नियमांची प्रकर्षाने आठवण येते.

अर्थात त्यांच्या गंमतीशीर खोचक बोलण्यातून देखील एखादेवेळी विचित्र प्रसंग उभा राहायचाच!

इंग्रजीचे शिक्षक असल्यामुळे मधून मधून इंग्रजी शब्दांचा वापर करण्यात ते स्वतःला धन्य समजत असत. असाच कोणता तरी इंग्रजी शब्द वापरल्यावर मागील बाकावर बसलेल्या एका विद्यार्थ्याला आपण जे बोललो ते समजलेले नाही हे त्याच्या मख्ख चेहेऱ्यावरूनच त्यांच्या लक्षात आले.

‘उठा, काय म्हणालो आम्ही ते समजले?’ देव सरांनी कितीही मार्दवतेने प्रश्न विचारला तरी त्याचे उत्तर द्यायचे धाडस काही त्या मुलात नव्हते. तो आपला खाली

नजर लावून बाकाकडे पहात शुंभासारखा उभा राहिला. त्याची ती अवस्था पाहून सरांना मात्र गंमत करायची लहर आली.

'न समजणाऱ्या भाषेत बोललंऽ की होतंऽ असं कधी कधीऽऽ,' सरांच्या स्वरातून मिश्किलता डोकावू लागली.

'एका खेडेगावातल्या एस्टी स्टॅण्डवर पुण्याला जाणारी गाडी कुठे लागते ते मी एका माणसाला विचारले. ''ह्येऽ काय हितंच हाय नव्हं,'' असं म्हणून त्यानं मला शेजारीच उभी असलेली गाडी दाखवली.' देव सरांना अशा गोष्टी सांगायची फार हौस. 'त्याचे आभार मानायला मी त्याला थॅक्यू म्हणालो मात्र, तो एकदम खवळला. त्याला वाटलं मी त्याला शिवी घातली - इंग्रजीतून. त्यानं माझे आईबापच काढले. ''एऽ, तुझ्या आयला ठॅकू, तुझ्या बापाला ठॅकू''. न समजणाऱ्या भाषेत बोललंऽ की असंच होतं'

सरांच्या या गमतीशीर विनोदाने साऱ्या वर्गात हास्याची खसखस पिकली - पण ती केवळ क्षणभरच. दुसऱ्याच क्षणी त्या विद्यार्थ्याला मात्र ढसाढसा रडतांना पाहून मात्र समस्त विद्यार्थी एकदम चिडीचूप झाले.

इतकेच काय, खुद्द देव सरांचाही चेहेरा विलक्षण गोरामोरा झाला. त्याला रडवायचे हा हेतूच नव्हता ना त्यांचा!

'अरे, मी काय मारलं का रे तुला?' सर त्याला काकुळतीने विचारत होते. 'असा का रडतोय हा? असं काय केलंय रे मी तुला?'

साऱ्या वर्गासमोर आपली बाजू मांडतांना देव सरांना पाहून सगळ्यांना नुसते वाईटच वाटले नाही तर ते दिङ्गमूढ झाले.

'त्याला वडिल नाहीत, सर,' त्याच्या मित्राने त्याची बाजू मांडली.

'अरे, पण मी कुठे त्याच्या वडलांना उद्द्शून काही बोललो,' आता तर त्यांचा स्वर अगदीच कसनुसा झाला होता. 'नको रे रडू.'

अन त्यानंतर त्यांचा त्या दिवशीचा तास काही रंगलाच नाही.

तसा ना त्यांच्या वागण्यात दंभ ना कपड्यात भपका. लफ्फेदार दुटांगी धोतरावर स्वच्छ धुतलेला सदरा आणि त्यावर कोट हा त्यांचा नेहेमीचा पेहेराव. त्यांच्या कोकणस्थी गौरवर्ण चेहेऱ्यावर तपकिरी प्लास्टिकच्या फ्रेमचा चष्मा त्यांना स्वतःला देखील कधी सुखकर वाटला नसावा. वरचेवर चष्मा काढून टेबलावर ठेवणे आणि दिसायला त्रास होऊ लागला की तो पुन्हा नाकावर चढविणे हा त्यांचा नेहमीचाच चाळा होता. किंबहुना घरात लिहिण्या-वाचण्याचे काम करत नसतांना तर त्यांच्या डोळ्याला कधीच चष्मा नसायचा. विषेशतः अशा गोष्टी सांगतांना तर ते हमखास आपला चष्मा काढून टेबलावर ठेवीत असत.

साऱ्या वर्गाला आपल्या गमतीशीर गोष्टींनी हसविणाऱ्या देव सरांनी सांगितलेल्या अनाथ मुलाच्या गोष्टीचा मात्र वेगळाच परिणाम घडला होता.

'हा अनाथ मुलगा शिकण्याच्या दुर्दम्य इच्छेने पुण्यात आला - बरोबर फक्त नेसूचे कपडे आणि आपले नशीब! दोन वेळेचे कसले एका वेळेचे सुद्धा खायचे मिळायची भ्रांत तिथे शिकण्यासाठी पुस्तके तरी कोठून मिळविणार तो! मिळेल तिथून काही तरी पैदा करून पोटाची खळगी भरण्यात अगदी खचून जायचा बिचारा. आपण येथे येऊन चूक तर केली नाही ना असे वाटायचे त्याला कित्येकदा. तरीही हा विचार मनात आला रे आला तो स्वतःला समजावून सांगायचा, "बाबा रे, पुण्यात नाही शिकायला मिळाले तर कुठे शिकशील तू?" कित्येकदा मंगल कार्यालयांच्या बाहेर उभे राहून बाहेर टाकण्यासाठी आणलेल्या उष्ट्या पत्रावळी मागून घेऊन तर कधी टाकून दिलेले अन्न उचलून तो गुजारा

करीत असे. मिळालेल्या शिळ्यापाक्या अन्नावर कधी बुरशी असायची. आपल्या सदऱ्यानेच ती बुरशी पुसून जठराग्नीला आहुती द्यायची वेळ सुद्धा यायची त्याच्यावर.

'अशातच काही मुलांशी ओळखी काढून, त्यांच्याशी मैत्री करून तो त्यांची पुस्तके वापरू लागला. पुढे अशातल्याच एका मित्राच्या सांगण्यावरून अप्पा बळवंत चौकातून चिंध्या झालेली पुस्तके पैदा करून ती वापरू लागला तो. इतर मुलांच्या जुन्या वह्यांमधील कोरे कागद फाडून घेऊन तो वह्यांची उणीव भरून काढत असे.

'असे हाल सोसत सोसत तो मुलगा मोठ्या जिद्दीने शिकला -

'- आणि आज तो तुमच्यासमोर देव मास्तर म्हणून इंग्रजी शिकवायला उभा राहिला आहे.'

संपूर्ण गोष्ट ऐकतांना हेलावून गेलेला आमचा दहावी अ चा वर्ग त्या कथेचा शेवट ऐकल्यानंतर मात्र दिङ्‌गमूढ झाला, अंतर्मुख झाला, हेलावून गेला. त्या दिवशी ना सरांची शिकविण्याची मनःस्थिती होती ना विद्यार्थ्यांची शिकण्याची. सारा तास इतर गप्पा गोष्टीतच गेला; मात्र त्या काही रंगत नव्हत्या.

इतरांचे मला माहिती नाही पण माझ्या मनातील देव सरांची आधीच आदरणीय असलेली प्रतिमा त्या दिवसानंतर मात्र विलक्षण उंचावली. आपले वडिल सधन आहेत, ते आपल्या शिक्षणात कोणत्याही प्रकारचे विघ्न येऊ देत नाहीत की आपल्याला कसलीच तोशीस पड् देत नाहीत याचे पूर्वी कधीच न वाटलेले अप्रूप मला त्या दिवसापासून वाटू लागले.

इतक्या हालअपेष्टांमधून आपले शिक्षण पूर्ण करणाऱ्या देव सरांच्या दैनंदिन वागण्यांतून त्याची कोणालाच जाणीव होत नसे. सदैव स्वतः हंसतमुख रहायचा आणि दुसऱ्याला हंसवत रहायचा स्वभाव त्यांनी कुठून पैदा केला आणि कसा जोपासला हे त्यांचे त्यांनाच ठाऊक! कसल्याही परिस्थितीत सदैव चेष्टा-मस्करीचा आधार घेत कायम ते वातावरणात येणारा तणाव नष्ट करून हास्याचे फवारे फुलवित असत.

वास्तविक तास संपल्याची घंटा केव्हाच होऊन गेली होती, पुढच्या तासाचे शिक्षक येऊन दारात उभे राहिले होते. आपल्या शिकविण्यात दंगून गेलेल्या देव सरांना मात्र आपला मुद्दा पूर्ण केल्याखेरीज वर्ग सोडायचा नव्हता. पाच-दहा मिनिटे गेल्यानंतर मात्र पुढच्या तासाचे शिक्षक अंमळ अस्वथ झाले. त्यांची ती अस्वस्थता बऱ्याच विद्यार्थ्यांच्या लक्षात आली होती, पण सांगणार कसे देव सरांना!

त्यातच विनयने आपण वर्गसेक्रटरी असल्याची जाणीव ठेवून देव सरांना खुणेनेच बाहेर उभ्या असलेल्या शिक्षकांची जाणीव करून दिली.

'थांबा! अस्वस्थ होऊ नका असे, देव जागा आहे,' वर्गाच्या दाराकडे पहात देव सरांनी ठोकलेल्या या आरोळीने साऱ्या वर्गालाच काय पण बाहेर तिष्ठत असलेल्या शिक्षकांनाही हंसू आवरले नाही.

आता सांगा, राहीलच कसा तणाव परिस्थितीत?

विविध शिक्षकांच्या शिकविण्याच्या वेगवेगळ्या पद्धती माझ्या अनुभवाला आल्या आहेत. काही शिक्षकांचा हेतू केवळ परीक्षेत चांगल्या प्रकारे उत्तरे लिहून आपल्या विद्यार्थ्यांना भरपूर गुण मिळावेत असा असतो तर काहींचा मात्र त्याबरोबरच विद्यार्थ्यांना विषय चांगला समजला पहिजे यावरही कटाक्ष असतो. देव सरांचा मात्र केवळ आपल्या विद्यार्थ्यांना विषय समजावा यासाठी विलक्षण आटापिटा असे. एकदा विषय समजला की परीक्षेत उत्तरे लिहायला आपोआपच जमते यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

देव सर केवळ 'प्रोज'च शिकवितात असे मी माझ्या थोरल्या भावाकडून ऐकले होते. आम्हाला मात्र ते इंग्रजी काव्य देखील शिकवायचे.

शिकवितांना धड्याशी किंवा कवितेशी एकरूप होण्याची देव सरांची हातोटी अद्वितीयच होती. त्यांच्या या कलागुणामुळे विद्यार्थ्यांना माझ्या मते त्यातील आशयाचा बहुधा असंप्रज्ञात आत्मसाक्षात्कार होत असावा.

टेनिसनची "होम दे ब्रॉट हर वॉरियर डेड' ही विख्यात कविता शिकवितांना स्तॅनिस्लाव्स्केने आपल्या नाट्यकलेवरील दहा खंडातील पहिल्या खंडात प्रतिपादन केलेले "पर्सनलायझेशन" म्हणजे काय याची पुरेपूर प्रचिती दिली देव सरांनी आम्हाला. युद्धात मारले गेलेल्या त्या योद्ध्याच्या घरातील प्रसंग विलक्षण तळमळीने त्यांनी साऱ्या वर्गासमोर उभा केला होता. त्यांच्या या एकपात्री प्रयोगात त्या घरातील पंचाण्णव वर्षाच्या जख्खड दाईची भूमिका त्यांनी साकारायला सुरूवात केल्यावर वर्गातील यच्च्यावत मुले आपापली उत्सुकता कशीबशी दाबून आतुरतेने बसली होती. त्या योध्याच्या पत्नीच्या डोळ्यातून अश्रू यावेत, तिने ढसाढसा रडावे यासाठी घरातील सगळे नातेवाईक आणि सगेसोयरे प्रयत्न करून थकले होते. आता त्या दाईने त्या योद्धयाच्या पत्नीच्या डोळ्यातून अश्रू यावेत यासाठी हिकमत लढवून तिच्या तान्ह्या बाळाला पाळण्यातून उचलून कसे तिच्या मांडीत ठेवले आणि त्यानंतर ती वीरपत्नी आपल्या तान्ह्याला उराशी कवटाळून कशी हंबरडा फोडून रडली हे देव सरांनी ज्या आत्मीयतेने साकार करत समजावून सांगितले त्यामुळे त्यांच्या बरोबरच साऱ्या मुलांच्या डोळ्यातूनही अश्रू तरळले.

त्या आधी आम्ही शिकलेल्या इंग्रजी कविता या 'बाबा ब्लॅकशिप' किंवा 'ट्विंकल ट्विंकल लिटल् स्टार' यांसारख्या बाळबोध कविताच होत्या असे म्हटले तरी चालेल. देव सरांनी 'होम दे ब्रॉट हर वॉरियर डेड' ही टेनिसनची कविता शिकविल्यानंतर माझ्या मनातील इंग्रजी कवितांविषयी असलेली भीती आणि घृणा कुठल्याकुठे पळाली. टेनिसनच्या या कवितेतून देव सरांनी आम्हाला इंग्रजीतील अभिजात काव्याशी ओळख करून दिली. त्यामुळे त्यांनी माझ्या मनात इंग्रजी काव्याविषयी इतके विलक्षण आकर्षण निर्माण केले की त्यानंतर न राहवून मी गोल्डन ट्रेझरी हा विल्यम शेक्सपीयर, वर्डस्वर्थ, टेनिसन, कीट्स्, शेले, बायरन यांच्यासारख्या बुजुर्ग आणि श्रेष्ठ इंग्रजी कवींच्या कवितांच्या खजिन्याचे भांडार असलेला ग्रंथ विकत आणून वाचला. खरे म्हणजे वाचला असे म्हणणे हे अगदीच रुक्ष झाले; मी त्या काव्य संग्रहात बुडून गेलो चिंब झालो.

सुदेवने त्यातल्या काही कविता आम्हाला महाविद्यालयात असल्याने मला तर देव सरांनी शिकविलेल्या 'होम दे ब्रॉट हर वॉरियर डेड'चा पाया खूपच उपयुक्त ठरला.

महाविद्यालयात 'ला बेले दान सान्स मर्सी', 'डॅफोडिल्स' यांसारख्या कवितांमध्ये रमून जात असतांना देव सरांचा मात्र वियोग झाला. मधून मधून त्यांची आठवण झाल्यावर त्यांना त्यांच्या स. प. महाविद्यालयामागील भारत गायन समाजच्या बोळातील त्यांच्या घरी जाऊन भेटून यायचा उपक्रम मी जारी ठेवला होता. अर्थातच वैद्यकीय महाविद्यालयात गेल्यावर या भेटीचे प्रमाण खूपच कमी झाले आणि मी एम्. बी. बी. एस्. झाल्यानंतर तर एम्. डी. पदरात पडेपर्यंत त्यांची साधी भेट सुद्धा घडू शकली नाही.

मी एम्. डी. झालो याचा कोण आनंद झाला होता देव सरांना ते त्यांच्या नजरेतूनच जाणवित होते मला. त्यांचे आशीर्वाद घेऊन मी तिथून निघालो ते थेट मंचरला नोकरीवर रुजू होण्यासाठी. मात्र तिथे माझे मन रमेना म्हणून काही महिन्यातच मी ती नोकरी सोडून वैद्यकीय व्यवसाय सुरू करण्यासाठी परत पुण्यात आलो. सुरुवातीला वर्षभर एका छोट्या जागेत व्यवसाय केल्यावर मी कर्वे रस्त्यावरती माझ्या वडिलांनी माझ्यासाठी राखून ठेवलेल्या जागेत माझे स्वतःचे रुग्णालय बांधले. या रुग्णालयाच्या उद्‌घाटन समारंभाला मी आवर्जून देव सरांना त्यांच्या घरी जाऊन आमंत्रण दिले. त्यांनीही मोठ्या कौतुकाच्या स्वरात 'नक्की येणार' अशी ग्वाही दिली.

त्या दिवशी रात्री दहा वाजेपर्यंत चक्रवाकालाही ओशाळे वाटावे इतक्या आतुरतेने मी त्यांची वाट पहात होतो; पण देव सर आलेच नाहीत. फार विरस झाला माझा.

नंतर मात्र ते आले. दुसऱ्याच दिवशी आले. त्याकाळात मी माझ्या रुग्णालयाच्या शेजारच्याच माझ्या वडिलांच्या घरी रहात होतो. तेथे मी दुपारचे जेवण घेत असतांना माझ्या रुग्णालयातील नर्स माझ्याकडे कोणी पाहुणे आल्याचे सांगत आली. मात्र कोण आले आहेत हे विचारायची मला गरजच पडली नाही. एखाद्या ढगाआडून डोकावणाऱ्या सूर्यासारखा त्या नर्सच्या मागून देव सरांचा चेहेरा डोकावला आणि विलक्षण आनंदाने मी पानावरून उठून त्यांच्या स्वागतासाठी धावत गेलो. तोपर्यंत देव सर नर्सला डावी घालून पुढे सरकलेच होते.

नेहमीसारखाच त्यांच्या लफ्फेदार दुटांगी धोतरावर निळ्या उभ्या काड्यांच्या सदऱ्याचाच पोषाख होता त्यांचा - मात्र अनपेक्षितपणे त्यांच्या कडेवर एखाद्या नवजात शिशूसारखे एक भले मोठे कलिंगड विसावले होते - विसावले होते असे म्हणण्यापेक्षा देव सरांनी ते मोठ्या कष्टाने पेलले होते असे म्हणणेच अधिक योग्य ठरावे.

'अरे, तू भरल्या पानावरून उठू नकोस पाहू,' कसाबसा तोल सांभाळत देव सरांनी ते कलिंगड तेथेच जमिनीवर खाली ठेवले. 'तू जेवून घे बरं आधी.'

'सर, तुम्ही आत तर या ना,' मी चटकन वाकून उष्ट्या हातानेच त्यांच्या पाया पडलो.

'नको, तुझ्या जेवणाचा खोळंबा नाही करत मी, यशस्वी हो,' देव सरांनी मला खांद्याला धरून उठविले. 'लगेचच निघणार आहे मी. काल नाही जमले यायला मला, पण आज आलो. तू हॉस्पिटल सुरू केलेस - स्वतःचे; केवढा आनंद झालाय मला; ऊर अगदी अभिमानाने भरून आलय बघ माझा. आपल्या नात्याइतकंच रसाळ आणि गोड कलिंगड आणलं आहे बघ तुझ्यासाठी - माझी आठवण म्हणून!'

अन् मला काही बोलायची संधी देखील न देता ज्या जितक्या अनपेक्षितपणे आले होते तितक्याच झपाट्याने देव सर निघून गेले.

आपली रसाळ गोड आठवण ठेवून निघून गेले.

माझ्या आयुष्यातून कायमचेच निघून गेले.

त्या नंतर माझी आणि त्यांची भेट कधी झालीच नाही. काही दिवसांनंतर मी भारत गायन समाजच्या बोळातील त्यांच्या घरी गेलो होतो, पण आपल्या जमिनीवर बंगला बांधून ते तिकडे रहायला गेलेत कायमचे एवढेच मला त्यांच्याविषयी समजले. त्यांचा हा बंगला नक्की कोठे आहे हे मात्र मला कोणीच सांगू शकले नाही.

अन् त्यानंतर काही वर्षांनी 'आता ते नसतात' एवढीच बातमी आली कानावर.

देव सर देहाने माझ्या आयुष्यातून गेले तरीही आमच्यातील संबंधाच्या रसाळ गोड स्मृती माझ्या मनात शाश्वत स्वरूपात रेंगाळत ठेवूनच गेले.

**डॉ. निशिकान्त श्रोत्री**

४०/१-अ, कर्वे रस्ता, पुणे ४११००४

(०२०)२५४३३२३३ / ९८९०११७७५४